# बेरोजगारी? . . . पर्याय आहेत!

**बड्या 7 आयटी कंपन्यांतून 56,000 कर्मचारी कपात**

**NASSCOMM – McKinsey अहवालानूसार पुढील ३ वर्षात आयटी क्षेत्रात ६ लाख कर्मचारी कपात होण्याची शक्यता**

**पोलीस भरतीच्या ४०० जागांसाठी ८२,००० अर्ज**

**SBI पुढील 2 वर्षात 10% नी कर्मचारी कपात करणार**

***"अब कोई युवा नहीं रहेगा बेकार, अब की बार मोदी सरकार"*** असे आश्वासन देत २०१४ साली मोदी सरकार सत्तेत आले. आता मोदी सरकारचा कार्यकाळ संपत आला तरीसुद्धा परिस्थितीमध्ये काही सुधार नाही, उलट बेरोजगारीची समस्या आणखी गंभीर झाली आहे. बेरोजगारीच्या समस्येच्या कारणांबद्दल जनतेची, विशेषकरून तरुणांची दिशाभूल केली जात आहे. त्यामुळे या समस्येची खरी कारणे आणि तिच्या उपायांबद्दल चर्चा करणे गरजेचे आहे.

## काय आहे बेरोजगारीची परिस्थिती?

भारतात दरवर्षी **१.३ कोटी** नवीन तरुण नोकरी शोधण्यासाठी बाहेर पडतात. २०००–२०१० या कालावधीत १३ कोटी तरुण नौकरी शोधण्यासाठी घराबाहेर पडले. पण या काळात फक्त ३४.४१ लाख नौकऱ्यांची निर्मिती झाली. म्हणजे १००० तरुण नौकरी शोधण्यासाठी घराबाहेर पडले. पण नौकऱ्या होत्या फक्त २६. मोदी सरकारच्या मागील ४ वर्षात तर रोजगार निर्मिती आणखीच कमी झाली आहे.

| वर्ष | ८ श्रमप्रधान उद्योगांत रोजगार वाढ |
|---|---|
| **२००९** | १२.५६ लाख |
| **२०१६** | २.३१ लाख |

## बेरोजगारीची कारणे काय आहेत?

आपल्या शाळेत, कॉलेजमध्ये, वर्तमानपत्रांमध्ये, टी.व्ही. आणि अशा इतर माध्यमांमधून 'भारताची लोकसंख्या हे बेरोजगारीचे कारण आहे' असे आपल्यावर ठसवले जाते. पण खरंच हे कारण आहे का?

***बेरोजगारीच्या प्रश्नावर चर्चा करत असताना लोकसंख्येपेक्षा लोकसंख्येची घनता विचारात घ्यायला पाहिजे.***

| देश | लोकसंख्या घनता |
|---|---|
| **ब्राझील** | २५ |
| **भारत** | ४०१ |
| **जपान** | ३३५ |
| **नेदरलँड्स** | ४१३ |
| **दक्षिण कोरिया** | ५१३ |
| **तैवान** | ६५१ |

लोकसंख्या घनता म्हणजे एखाद्या देशात दर चौरस किलोमीटर क्षेत्रफळात राहणाऱ्या लोकांची सरासरी संख्या. समजा एका देशाची लोकसंख्या आहे १०० आणि क्षेत्रफळ आहे ५ चौरस किलोमीटर, तर त्या देशाची लोकसंख्या घनता होईल २०.

ब्राझीलची लोकसंख्या घनता २५ (इतकी कमी) असूनही तो देश आपल्याइतकाच विकसनशील आहे. दुसरीकडे जपानची घनता (३३५) जवळपास भारताएवढीच, तरीही एवढा प्रगत आहे. नेदरलँड्स (४१३), दक्षिण कोरिया (५१३), तैवान (६५१) यांची घनता जास्त असूनही हे देश भारतापेक्षा विकसित आहेत आणि तिथे नोकऱ्यांची संख्याही जास्त आहे. लोकसंख्याच कारण असतं तर ब्राझीलमध्ये काही प्रश्नच उरले नसते. पण असे चित्र नाही, त्यामुळे लोकसंख्येचा आणि बेरोजगारीचा तसा संबंध नाही. खरं तर बेरोजगारीच्या मूळ कारणांवरून आपले लक्ष भरकटवण्यासाठी लोकसंख्येसारख्या खोट्या कारणांना पुढे केलं जातं.

## मग खरं कारण काय?




बेरोजगारीसाठी सरकारची लोकविरोधी आणि उद्योगपतीधार्जिणी धोरणे कारणीभूत आहेत. सरकार म्हणते की नौकऱ्या निर्माण करण्यासाठी पैसे नाहीत. पण सरकार आपल्याला फसवत आहे. खरंतर सरकारकडे सामान्य जनतेवर लावलेल्या करातून भरपूर पैसा गोळा होतो. पण हा पैसा सरकार सामान्य जनतेवर खर्च न करता वेगवेगळ्या मार्गांनी उद्योगपतींच्या आणि श्रीमंताच्या खिशात टाकत असते. गेल्या १३ वर्षात उद्योगपतींना अणि श्रीमंतांना **५८ लाख कोटी रुपये** इतकी करमाफी दिली,

त्यापैकी **मागील ४ वर्षातच २२ लाख कोटी रुपये** इतका कर माफ करण्यात आला. याशिवाय विविध मार्गांनी केलेली **कर्जमाफी ८.६ लाख कोटी रुपये** इतकी आहे. पैसा आहे . . . पण फक्त श्रीमंतांसाठी!

## उद्योगपती नौकऱ्या निर्माण करत नाहीत!

जसा लोकसंख्येबद्दल आपल्यात भ्रम पसरवला गेला आहे तसाच आणखी एक भ्रम म्हणजे उद्योगपती नौकऱ्या निर्माण करतात आणि म्हणून त्यांना करमाफी–कर्जमाफी दिली तर काय हरकत आहे? सत्य तपासण्यासाठी आपण देशातील मोठ्या कंपनीचं उदाहरण पाहू. बजाज ऑटो कंपनीमध्ये २००८ साली २४,७७,१५१ गाड्यांचे उत्पादन झाले तेव्हा ९,५०९ कामगार होते, तेच २०१२ मध्ये गाड्यांचे उत्पादन ४३,६३,०९९ पर्यंत वाढले पण कामगार मात्र कमी (८,६२७) झाले. २०१८ मध्ये देखील कामगारांची संख्या ९,५०३ इतकीच आहे पण उत्पादन बरेच वाढले आहे. इतर कंपन्यांमध्येही परिस्थिती कमी-अधिक सारखीच आहे. या कंपन्या रोजगार निर्माण करत नाहीतच उलट कामगारांना कमी करतात आणि स्वतःचा नफा वाढवतात.

BAJAJ **बजाज ऑटो लिमिटेड**

| वर्ष | गाड्यांचे एकूण उत्पादन | कामगार संख्या |
|---|---|---|
| २००८ | २४,७७,१५१ | ९,५०९ |
| २०१२ | ४३,६३,०९९ | ८,६२७ |

## मग नोकऱ्या निर्माण कशा होणार?




खरं तर सरकारने मनात आणलं तर भारतात करोडो नोकऱ्या निर्माण होऊ शकतात. प्रथम देशाची ५०% जनता ज्या शेतीवर अवलंबून आहे त्यावर सरकारने गुंतवणूक वाढवायला पहिजे. या वर्षी शेती मंत्रालयाची तरतूद **फक्त ५८ हजार कोटी** रुपए आहे. शेतीतील गुंतवणूक वाढली तर गावांकडे कितीतरी रोजगार उपलब्ध होतील.

शेतीसोबतच सरकारी नोकऱ्या पण निर्माण होऊ शकतात. खरं तर आधी सरकारी नोकऱ्यांची उपलब्धता आतापेक्षा बरीच जास्त होती. १९९१ मध्ये खाजगीकरण–जागतिकीकरण–उदारीकरणाच्या धोरणांमुळे सरकारी नोकऱ्या झपाट्याने कमी झाल्या.

स्वीडनमध्ये दर १ लाख लोकसंख्येमागे १५,०७० सरकारी नोकऱ्या आहेत, फ्रांसमध्ये ८,७६०, तर अमेरिकेत ७,२२० सरकारी नोकऱ्या आहेत, आणि भारतात फक्त १,४३०! जर अमेरिकेच्या प्रमाणात भारतात सरकारी नोकऱ्यांची निर्मिती केली तर भारतात **७ करोड** नवीन नोकऱ्या निर्माण होतील. इतक्या तर सरकारी नोकऱ्या होतील आणि दुसरीकडे खाजगी क्षेत्रातही नोकऱ्या निर्माण होतील. खाजगी कंपन्या कामगारांना दिल्या जाणाऱ्या पगाराच्या जवळपास चारपट इतका जास्त नफा कमावतात. कंपन्यांचा नफा नियंत्रित केला तर कामगारांची संख्या दुप्पट होईल.

## काय करण्याची गरज आहे?




आपल्याकडे १००–२०० जागांमधील आरक्षणासाठी प्रत्येक जातीचे लाखोंचे मोर्चे निघत आहेत. त्याऐवजी सर्व जाती-धर्मांचे लोक जर **‘शेतीमधील गुंतवणूक वाढलीच पाहिजे’**, **‘सरकारी आणि खाजगी नोकऱ्या वाढल्याच पाहिजेत’** या मागण्यांसाठी एकत्र आले, तर करोडो नोकऱ्या निर्माण होऊ शकतात. म्हणून आपल्याला जाती-धर्मांच्या पलीकडे जाऊन एकजूट व्हावे लागेल आणि **अपल्या सर्वांसाठी** मागणी करावी लागेल. जर तुम्हाला आमचं म्हणणं पटत असेल, तर तुम्हीही आमच्या उपक्रमांमध्ये नक्की सहभागी व्हा. त्यासाठी आमच्या खालील पत्त्यांवर संपर्क करू शकता.

# लोकायत

**संपर्क पत्ता:** लोकायत, १२९ बी/२, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, एरंडवणे, पुणे – ४

*(या पत्त्यावर दर रविवारी संध्या. ५ ते ७:३० या वेळेत लोकायतची बैठक होते. बैठकीत आपलं स्वागत आहे.)*

अलका – 9067003838 ऋषिकेश – 9423507864 www.lokayat.org.in lokayat.india@gmail.com

lokayat.india lokayat.india @lokayat lokayatpune abhivyakti.pune KafilaOfficial

हे पत्रक अलका जोशी यांनी लोकायतसाठी गुरुवार, दि. ९ मे २०१९ रोजी पुणे येथे प्रकाशित केले.